■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक ४१ ● मंगळवार, दि. ३ ते १० मार्च २०२६ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

■ जिल्हास्तरीय गुरुदेव कार्यकर्ता संमेलनाचे थाटात उद्घाटन ■

# राष्ट्रसंतांचे विचार काळाची गरज - आचार्य हरिभाऊ वेरुळकर

**वाशिम - धार्मिकता व आध्यात्मिकता यांचे खरे ज्ञान जरुरी आहे. समाजामध्ये आज मोठी विसंगती दिसत असून व्यसन विभिचार व अनैतिकताला अनेक जण प्राथमिकता देत असल्याचे चित्र डोळ्यासमोर येत आहे ही बाब निश्चित चिंतनिया आहे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून समाज प्रबोधन करून सुसंस्कारित पिढी निर्माण करण्याचे कार्य केले आहे मानवता हे धर्म मेरा हा संदेश महाराजांनी दिला.**




राष्ट्रसंतांच्या विचाराची आज समाजाला गरज असल्याचे प्रतिपादन आजीवन प्रचारक गुरुकुंज आश्रमचे आचार्य हरिभाऊ वेरूळकर गुरुजी यांनी केले.. स्थानिक वैकुंठ धाम वासी मातोश्री सो.स्नेहलता पुनमचंद सोमानी परिसर वाटाणे लॉन येथे शनिवार २७ फेब्रुवारी रोजी आयोजित जिल्हास्तरीय श्री गुरुदेव कार्यकर्ता संमेलनात उद्घाटक म्हणून त्यांनी वरील विचार मांडले. सदर कार्यक्रमाला मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष वारकरी सेवक दिनकरराव वाटाणे उपस्थित होते मंचावर अतिथी म्हणून आजीवन प्रचारक ह भ प नामदेवराव गव्हाळे महाराज, अध्यात्म गुरुकुलचे संचालक रवी मानव, ह भ प सागर महाराज परिस्कर , स्वागत अध्यक्ष गिरधरीलाल सारडा, जिल्हा सेवाअधिकारी सुनील दशमुखे ,आयोजक कार्याध्यक्ष निलेश सोमानी अँड .सुरेश टेकाळे,विज्ञान भारतीचे जिल्हा संयोजक प्राध्यापक राजेश गोरुले, समाजसेवी मुख्य समन्वयक डॉ. हरीश बाहेती, हभप पंकजपाल महाराज, ह भ प लक्ष्मणराव आवटे दादा, ज्ञानेश्वर कवळे महाराज, बोडस महाराज, अँड .सौ.भारती सोमानी , सौ.वृषाली टेकाळे , सौ.दीपा वानखेडे उपस्थित होते

सर्वप्रथम दीप प्रजलवन व राष्ट्रसंतांच्या प्रतिमेचे पूजन हार अर्पण करण्यात आले. तदनंतर सर्व मान्यवरांचा सन्मानचिन्ह बुके व विश्व पार्थना किट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी रवी मानव यांनी राष्ट्रसंतांची सामाजिक क्रांती व आजचा संघर्ष या विषयावर मार्गदर्शन केले . मानव यांनी वाशिम जिल्ह्यात प्रत्येक महाविद्यालयांमध्ये प्रबोधनाची वारी काढणार असल्याचे जाहीर केले.ह भ प सागर महाराज परिस्कर यांनी समाजामध्ये जाती धर्माच्या नावाने जो प्रकार सुरू आहे यावर चिंतन होणे जरुरी आहे राष्ट्रसंतांचे अनेक दाखले देत त्यांनी समाजामध्ये एकोपा राहावा चांगल्या कार्याला बळ मिळावे यासाठी समाजाने सत्याला धरून व कीर्तनकार प्रवचनकार यांनीही कुणालाही न भीता सत्य कतन करण्याचे आव्हान केले, प्राध्यापक राजेश गोरुले डॉक्टर बाहेती यांनी आपले विचार मांडले ह भ प नामदेवराव गव्हाळे महाराज यांनी कर्मकांडावर प्रहार केला कोरोना काळात डॉक्टर हा देव म्हणून उभा राहिला माणसातच खरा देव असल्याचे त्यांनी सांगून आज युवा पिढीला प्रबोधनाची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन निलेश सोमानी तर आभार एडवोकेट सुरेश टेकाळे यांनी मानले सदर गुरुदेव कार्यकर्ता मेळाव्याला जिल्ह्यातील मोठ्या संख्येने गुरुदेव मंडळी महिला भगिनी उपस्थित होत्या सामुदायिक प्रार्थना व चिंतन कार्यक्रम पार पडला.



## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशनात गणेश देगावकर यांचा गौरव

**रिसोड / नाजीम खान -**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने वाशिम येथे आयोजित राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या अधिवेशनात पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गणेश देगावकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.या भव्य सोहळ्यात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान सोहळा पार पडला. तसेच संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी, प्रदेश संघटक डॉ. विश्वासराव आरोटे, तसेच आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर व्यास महाराज आणि गजानन माऊली यांच्या हस्ते देगावकर यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी बोलताना गणेश देगावकर यांनी पत्रकार संघटन मजबूत करण्यासाठी केलेले कार्य, तसेच पत्रकारांच्या हक्कांसाठी सातत्याने उचललेला आवाज याची विशेष दखल घेतली. त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण आणि जिल्हास्तरीय पत्रकारांना नवी दिशा मिळाल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

अधिवेशनाला राज्यभरातील पत्रकार संघाचे पदाधिकारी, विविध जिल्ह्यांतील प्रतिनिधी, स्थानिक राजकीय नेते, व्यापारी वर्ग आणि समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात पत्रकार एकतेचा आणि सक्षमीकरणाचा संदेश अधोरेखित करण्यात आला.या अधिवेशनातून पत्रकारांच्या हक्कांसाठी अधिक संघटितपणे लढण्याची गरज अधोरेखित झाली असून, आगामी काळात पत्रकार संघटना अधिक प्रभावीपणे कार्य करणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## रिसोड तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र. १

**रिसोड/**

रिसोड : नागरिकांच्या महसूल विषयक तक्रारींचे जलद व प्रभावी निराकरण करण्यासाठी महसूल विभागामार्फत रिसोड तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान' टप्पा क्र. १ राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत तालुक्यातील विविध महसूल मंडळांमध्ये समाधान शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसूल विषयक दैनंदिन प्रश्नांचे तात्काळ निराकरण करण्यासाठी ही शिबिरे उपयुक्त ठरणार आहेत. रहिवासी, उत्पन्न व जात दाखले, रेशनकार्ड कामे, विविध शासकीय योजनांचा लाभ, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, पी.एम. किसान योजना, नवीन रेशनकार्ड वितरण, फेरफार नोंदी, अभिलेख दुरुस्ती आदी प्रकरणांवर मार्गदर्शन व कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच डिजिटल ७/१२ उतारा व




एक खिडकी (ढळपसश्रश्र थळपवेु) पद्धतीद्वारे अर्ज स्वीकारून तात्काळ निर्णय प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

**शिबिरांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे :**

०७.०३.२०२६ – कुमारेश्वर मंदिर संस्थान, मोप

१४.०३.२०२६ – श्री हनुमान मंदिर, रिठड

२०.०३.२०२६ – खंडोबा मंदिर, चिंचोली

२७.०३.२०२६ – बालाजी संस्थान सभागृह, केशवनगर

१०.०४.२०२६ –संत गजानन महाराज संस्थान, वाकद

१७.०४.२०२६ – जि. प. शाळा, केनवड

०८.०५.२०२६ – तहसील कार्यालय, रिसोड

१५.०५.२०२६ –श्री शिवाजी हायस्कूल, भर जहागीर

तालुक्यातील एकूण ८ ठिकाणी ही समाधान शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी तालुक्यातील सर्व नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले असून संबंधित महसूल अधिकारी, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निवारण करणार आहेत.

## राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांचे महागाई भत्त्यात १ जुलै २०२५ पासून तीन टक्के वाढ

रिसोड- राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्याच्या दरात दिनांक १ जुलै २०२५ पासून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५५% वरून ५८% करण्यात आला आहे सदर वाढ ही एक जुलै २०२५ पासून करण्यात आली असून एक फेब्रुवारी २०२६ पासून सदर महागाई भत्ता वाढ रोखीने देण्यात येणार आहे.

## श्री सखाराम महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन

**रिसोडः** श्रीक्षेत्र पैठण येथील नाथ षष्ठी उत्सवात सहभागी होण्यासाठी श्रीक्षेत्र लोणी ते श्रीक्षेत्र पैठण श्री सखाराम महाराज पालखी सोहळयाचे आयोजन श्री कल्याण महाराज यांचे मार्गदर्शनात करण्यात आले आहे.

दिनांक ४ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता महाआरती होऊन श्री सखाराम महाराजांचा पालखी सोहळा पैठण कडे तळणी मार्गे मार्गस्थ होणार आहे. नायगाव



येथील रामभाऊ राठोड यांचे शेतामध्ये पालखीचा पहिला मुक्काम राहणार आहे. ५ मार्च रोजी पालखीचा दुसरा मुक्काम श्री बालाजी मंदिर परतुर,६ मार्च रोजी पालखीचा तिसरा मुक्काम अंबड येथील जयप्रकाश राठी यांच्या घरी, ७ मार्च रोजी आपेगाव येथील पंडितराव ओटे यांचे शेतात,८ मार्च रोजी पालखी पैठणला पोहोचून गाडेश्वर मंदिर जवळ पालखीचा मुक्काम राहणार आहे. ९ मार्च १० मार्च रोजी पालखीचा मुक्काम पैठण येथे राहणार असून त्या ठिकाणी नाथ षष्ठी उत्सव व श्री सखाराम महाराजांच्यापादुकांनागंगा गोदावरी स्थान करण्यात येईल. पालखीचे मुक्कामाचे ठिकाणी भजन, नामांकित व्यक्तींचे कीर्तन, प्रवचन राहणार आहेत.११ मार्च रोजी पालखी परतीच्या मार्गावर निघून श्रीराम मंदिर जालना येथे पालखीचा मुक्काम राहील.१२ मार्च रोजी दुपारी तीन वाजता पालखी श्री सखाराम महाराज संस्थान येथे दाखल होईल व महाअर्थी नंतर प्रसाद वितरण करण्यात येईल.पालखी सोबत श्री सखाराम महाराज भजनी मंडळ लोणी, सोबतच गुंधा, बडव, वाघजाळी, कहाकर, रायगाव, लोणी खुर्द, सोनुना, सवड, शेलू खडसे, देऊळगाव वायसा, जांबुल, शिवनी, उटी, सालेगाव, धानोरा,बरडा,कापडशिंगी, घोडदरी, गोत्रा, उटी ब्रम्हचारी, वरखेडा,मन्नास पिंपरी आदी ठिकाणचे भजनी मंडळ राहणार आहेत.तरी भाविक भक्तांनी पालखीचे दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री सखाराम महाराज संस्थान तर्फे करण्यात आले आहे. श.प्र.

# तरच वन्यजीव वाचतील!

दिवसेंदिवस मानवी वस्तीवर बिबट, वाघ, लांडगे, कोल्हे यांचे हल्ले होत असल्याच्या बातम्या वाचण्यात येतात. हे वन्यजीव जंगल, वन, अभयारण्य सोडून बाहेर आले कसे? याची वन विभागाने शास्त्रीय चिकित्सा केली पाहिजे. जेव्हा वन समृद्ध होतील तेव्हा वन्यजीवांचे आश्रयस्थान निश्चित होईल. अन्यथा मानवी वस्ती हीसुद्धा त्यांची वस्ती असेल हे आज वास्तव आहे. भारत हा उष्ण कटिबंधीय प्रदेश असल्याने तीनही ऋतूंचे वैशिष्ट्ये महत्त्वपूर्ण आहे. ऊन्हाच्या झळांमुळे जंगल, वन व डोंगर, टेकडी माथ्यावरील वाढलेले गवत, इतर लहान झुडपे वाळली आहेत. सध्या अनेक डोंगर रांगाना आगी लागत आहेत. यात अनैसर्गिक व नैसर्गिकरीत्या वणवे लागून जंगले, त्यातील उपयुक्त वनस्पती, औषधी वनस्पती, पशु, पक्षी, कीटक, नष्ट होत चालले असून ते रोखण्यासाठी केवळ वनविभाग जबाबदारी पेलू शकत नाही. नागरी सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. वणवा लागण्याबाबत अनेक लोकांत व डोंगर दर्यात राहणार्या रहिवाशांमध्ये गैरसमज असतात. ते अनेक वर्षानुवर्षे तसेच आहेत. डोंगर भागात दैवी शक्तीमुळे आग लागते, आग लागल्याने नवीन गवत कुरण चांगले वाढते, हिरवळ मोठ्या प्रमाणात वाढते, झाडांना चांगली पालवी फुटते, पुढील हंगामात तेंदूच्या पानांचा आकार वाढावा म्हणून गडचिरोलीसारख्या भागात कृत्रिम वणवे लावतात, जंगलात वावरणे व शिकार करणे सोपे जाते अशा काही भाकड कारणांमुळे जंगलामधील नव्याने उगवण झालेली झाडे, झुडपे, पक्ष्यांची घरटे, अंडी, नवजात पिल्ले, सरपटणारे प्राणी आगीत होरपळले जातात. वन्यजीव मानवी वस्तीकडे का येऊ लागले हा प्रश्न महत्त्वाचा आहे. ९ डिसेंबर व २२ डिसेंबर २०२० रोजी पुण्यात रानगवा आला कसा? गवा हा प्राणी हिंस्र नसून तो गवत खात असल्याने तो तसा समुहाने राहणारा, लाजाळू स्वरूपाचा आहे. त्यास गायी-म्हशींच्या शिंगांसारखीच शिंगे असतात. सहसा इजा न करणारा पण हल्ला झाल्यावर, गोंधळ झाल्यावर सैरभैर होऊन जातो. तेच त्याच्या बाबतीत घडले. वन्यपशू, पक्षी मानवीवस्तीकडे कसे आले व ते पुन्हा नैसर्गिक अधिवासात कसे जातील याचे प्रात्यक्षिक नागरिकांना माहीतच नसल्याने बघ्यांची गर्दी त्यात फोटो काढण्यासाठी सरसावलेले मोबाइल, नागरिकांचा गोंधळ, गर्दी, सिमेंटच्या जंगलातून वाट काढीत वाट फुटेल त्या मार्गाने तो पळत सुटला. सातशे किलो वजनाच्या जवळपास असलेला हा जीव एकदाचा दमला. त्यात सहा तास हूल देऊन, झुंज देऊन अखेर त्याने जीव सोडला. त्यानंतर अनेकांचे प्राणीप्रेम उफाळून आले होते. नको त्या चर्चा रंगल्या होत्या, त्याच्या माफीचे बॅनरही लागले होते. अशा मंडळींनी कधी वन्यपशू, पक्षी संवर्धनाबाबत एक पाऊल उचलले नसते. मात्र प्राणी मात्रावर प्रेम करायला कधी शिकणार हा प्रश्न प्रत्येकाने आपल्या मनाला विचारला पाहिजे. वन, अभयारण्य तसेच माळरानाची समृद्धता वाढवणे, त्यांची संख्या वाढवणे हे दोन मूळ उद्देश ठेवून वन्यजीव संवर्धनाकडे पाहिले पाहिजे. जंगलांचे रुपांतर विकासाच्या नावाखाली सिमेंटच्या जंगलात होत गेले. वाढत्या शहरीकरणामुळे शहराच्या लगतचे जंगल नष्ट होत गेले. अशा परिस्थितीत वन्यजीव राहणार तरी कुठे? ते मानवी वस्तीकडे अतिक्रमण करणार हे स्वाभाविक आहे. विकासाच्या नावाखाली वन्यजीवांच्या अधिवासावर कधी घाला घातला गेला हे लक्षातच आले नाही. सध्या बदलत्या हवामानामुळे, विकासाच्या नावाखाली अफाट जंगल तोड त्यामुळे वने, डोंगर, दरी व रानातील जैवविविधता नष्ट झाली. त्यामुळे अन्नसाखळी तुटली. अन्न व पाणी शोधात भटकंती करत कधी मृत्यूला सामोरे जात तर कधी शेतपीक, पशुधनावर हल्ले होऊ लागले.

# सखाराम महाराज पालखी सोहळा उद्या

रिसोड, दि. २ (प्रतिनिधी)

श्रीक्षेत्र पैठण येथील नाथषष्ठी उत्सवात सहभागी होण्यासाठी श्रीक्षेत्र लोणी ते श्रीक्षेत्र पैठण श्री सखाराम महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन ४ मार्च रोजी श्री कल्याण महाराज यांचे मार्गदर्शनात करण्यात आले आहे.

४ मार्च रोजी सकाळी ९ वाजता महाआरती होऊन श्री सखाराम महाराजांचा पालखी सोहळा पैठणकडे तळणी मार्गे मार्गस्थ होणार आहे. नायगाव येथील रामभाऊ राठोड यांच्या शेतामध्ये पालखीचा पहिला मुक्काम राहणार आहे. ५ मार्च रोजी पालखीचा दुसरा मुक्काम श्री बालाजी मंदिर परतूर, ६ मार्च



रोजी पालखीचा तिसरा मुक्काम अंबड येथील जयप्रकाश राठी यांच्या घरी, ७ मार्च रोजी आपेगाव येथील पंडितराव ओटे यांच्या शेतात, ८ मार्च रोजी पालखी पैठणला पोहोचून गाडेश्वर मंदिर जवळ पालखीचा मुक्काम राहणार आहे. ९ व १० मार्च रोजी पालखीचा मुक्काम पैठण येथे राहणार असून त्या ठिकाणी नाथषष्ठी उत्सव व श्री सखाराम महाराजांच्या पादुकांना गंगा गोदावरी स्थान करण्यात येईल. पालखीचे मुक्कामाचे ठिकाणी भजन, नामांकित व्यक्तींचे कीर्तन, प्रवचन राहणार आहेत. ११ मार्च रोजी पालखी परतीच्या मार्गावर निघून श्रीराम मंदिर जालना येथे पालखीचा मुक्काम राहील,१२ मार्च रोजी दुपारी तीन वाजता पालखी श्री सखाराम महाराज संस्थान येथे दाखल होईल व महाआरती नंतर प्रसाद वितरण करण्यात येईल. पालखी सोबत श्री सखाराम महाराज भजनी मंडळ लोणी, सोबतच गुंधा,वडव, वाघजाळी, कहाकर, रायगाव,लोणी खुर्द, सोनुना, सवड, शेलू खडसे, देऊळगाव वायसा, जांबुल, शिवनी, उटी, सालेगाव, धानोरा, बरडा, कापडशिंगी, घोडदरी, गोत्रा, उटी ब्रम्हचारी, वरखेडा, मन्नास पिंपरी आदी ठिकाणचे भजनी मंडळ राहणार आहेत. तरी, भाविकांनी पालखीचे दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री सखाराम महाराज संस्थान तर्फे करण्यात आले आहे.

# रिसोड नगराध्यक्ष भगवान क्षीरसागर यांची भागवत परिवाराला भेट

**मालेगाव :** रिसोड नगरपरिषदच्या झालेल्या निवडणुकीच्या रणधुमाळी मध्ये लोकनियुक्त विजते उमेदवार भगवान दादा क्षीरसागर यांची आज मेडशी येथील भागवत परिवाराकडे सदिच्छा भेट देण्यात आली. त्यामुळे येथील नागरिकांकडून त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.नगराध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर त्यांची ही पहिलीच भेट असल्यामुळे मेडशीतील त्यांच्या नातलग व आप्तपरिवार मध्ये त्यांच्या या भेटीमुळे आनंदाचे वातावरण पसरले आहे. नेहमीच आपल्या दबंग कामगिरीमुळे व भारदस्त शैलीमुळे आपली जनसमान्यात वेगळी छाप पाडणारे व सदैव रिसोड सह परिसरातील जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडणारे असे बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून भगवान दादा क्षीरसागर यांची अष्टपैलू प्रतिमा जनसामान्यांना आपलेसे वाटणारे व्यक्तिमत्व व गेल्या पाच दशकांपासून सर्वसामान्यांच्या सेवेत असणारे भगवानदादा क्षीरसागर यांची मेडशी नगरीत हे निवडून आल्यानंतरची पहिलीच भेट असल्यामुळे यावेळी गोरखनाथ भागवत, संजय भागवत, शेख जमिर मा सरपंच मेडशी, विठल भागवत, नागेश भागवत,सुनील कुदळे,नितीन कुदळे, सचिन साठे, अजिंक्य मेडशीकर यांच्यासह परिसरातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एसटी बस तिकीट नियमांवर शासनाचा दिलासा

## NCMC कार्ड सध्या सक्तीचे नाही

**रिसोड :** एसटी बसने प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग व विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या सवलतींसाठी छउचउ कार्ड बंधनकारक करण्याच्या निर्णयाबाबत शासनाने मोठा दिलासा दिला आहे. नागरिकांकडून आलेल्या तक्रारी आणि विरोधानंतर सध्या NCMC स्मार्ट कार्ड सक्तीचे नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) डिजिटल सेवांच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल म्हणजे 'NCMC स्मार्ट कार्ड' उपक्रम होय. या उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अवघ्या आठवड्यातच १ लाख नोंदणीचा टप्पा पार करण्यात आला आहे.

केवळ आठवडाभरात एकूण १,००,०२१ प्रवाशांनी NCMC स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. यात 'महिला सन्मान योजना' अंतर्गत ३७,१२७ महिलांनी नोंदणी केली असून 'अमृत ज्येष्ठ नागरिक' योजनेअंतर्गत ३४,४८४ ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग नोंदवला आहे. तसेच इतर प्रवाशांची संख्याही लक्षणीय आहे. ही संख्या एसटीच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने प्रवाशांचा वाढता विश्वास दर्शवते.

१ मार्चपासून छउचउ कार्ड अनिवार्य होणार असल्याची अफवा समाजमाध्यमांवर पसरली होती. मात्र, जोपर्यंत ८० टक्के सवलतधारक प्रवाशांची स्मार्ट कार्ड नोंदणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत NCMC कार्ड सक्तीचे करण्यात येणार नाही, असे एसटी महामंडळाने स्पष्ट केले आहे. प्रत्येक आगारात NCMC स्मार्ट कार्ड नोंदणी प्रक्रिया सुरू असून प्रवाशांनी आपल्या जवळच्या बसस्थानक, आगार किंवा अधिकृत एजंटकडे नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. भविष्यात NCMC स्मार्ट कार्डमुळे सवलतधारक प्रवाशांना तिकीट खरेदी अधिक सुलभ होणार असून एकाच कार्डचा विविध सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी वापर करता येणार आहे. डिजिटल प्रणालीमुळे पारदर्शकता व सोय वाढणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी नमूद केले. शासनाच्या या स्पष्टीकरणामुळे प्रवाशांमध्ये संभ्रम दूर झाला असून सवलतींचा लाभ पूर्ववत सुरूराहणार असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

# दुबईला युद्धाचा विळखा: रिसोडचे 'निर्बान' कुटुंब सापडले संकटात

## सुरक्षित परतीसाठी प्रशासनाकडे आर्त हाक, कुटुंबियांची चिंता वाढली

प्रतिनिधी | वाशीम

जगाला आपल्या सौंदर्याने भुरळ घालणारे दुबई शहर सध्या युद्धाच्या सावटाखाली असून, या तणावपूर्ण परिस्थितीचा फटका वाशीम जिल्ह्यातील रिसोड येथील एका कुटुंबाला बसला आहे. पर्यटनासाठी गेलेले निर्बान कुटुंबातील चार सदस्य सध्या दुबईत अडकून पडले असून, मायदेशी सुखरूप परतण्यासाठी त्यांची आणि त्यांच्या नातेवाईकांची घडपड सुरू आहे.



युद्धामुळे दुबईत अडकलेले रिसोड तालुक्यातील निर्बान कुटुंबातील चार सदस्य.

आनंदाची सहल अन् युद्धाचं सावट

रिसोड येथील भगवान निर्बान, पद्माबाई निर्बान, पवन निर्बान आणि नंदा निर्बान हे चौघे २४ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात पुणे येथून दुबई पर्यटनासाठी रवाना झाले होते. २८ फेब्रुवारी रोजी अबूधाबी येथून त्यांचे परतीचे विमान होते. मात्र, दुबईतील वाढता तणाव आणि बिघडलेल्या परिस्थितीमुळे विमानसेवा अचानक स्थगित करण्यात आली. यामुळे या कुटुंबाचा परतीचा प्रवास अधांतरी राहिला असून, सध्या ते एका हॉटेलमध्ये आश्रयाला आहेत.

प्रशासनाच्या हस्तक्षेपाची मागणी

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून निर्बान कुटुंबाच्या नातेवाईकांनी केंद्र आणि राज्य सरकारकडे मदतीची आर्त हाक दिली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने तातडीने हस्तक्षेप करून दुबईत अडकलेल्या या भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे भारतात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.\'परिस्थिती कठीण आहे, पण आमचे कुटुंब धैर्याने तिथे थांबले आहे. सरकारने केवळ त्यांनाच नाही, तर तिथे अडकलेल्या सर्व भारतीयांना सुखरूप बाहेर काढावे, हीच आमची कळकळीची विनंती आहे. अशी भावना देखील निर्बान कुटुंबातील सदस्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. निर्बान कुटुंब वास्तव्यास असलेल्या हॉटेलच्या परिसरात बॉम्बस्फोट झाल्याची माहिती समोर आल्याने रिसोडमध्ये राहणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांच्या चिंतेत भर पडली आहे. सुदैवाने, हे चारही सदस्य सध्या सुरक्षित असून फोन आणि इंटरनेटच्या माध्यमातून ते आपल्या कुटुंबीयांशी सतत संपर्कात आहेत. 'आम्ही सुरक्षित आहोत, पण घराची ओढ लागली आहे,' असा संदेश जेव्हा त्यांच्याकडून येतो, तेव्हा इकडे नातेवाईकांचे डोळे पाणावत आहेत.

# रिसोड येथे पर्यावरणपुरक होलिकोत्सव कार्यक्रमाचे आयोजन

रिसोड : -होळी आणि रंगपंचमी हे दोन दिवस म्हणजे लहानापासून तर वयोवृध्दापर्यंत विविध रंगांची उधळण, मुक्तसंचार, तसेचं मनामध्ये इतरांबद्दल काही कारणास्तव कित्येक दिवसापासून कुजलेल्या भाव-भावनांना वाट मोकळी करून देत मनोमिलन घडवून आणण्याची एक पर्वणीच आहे असे म्हणने वावगे होणार नाही. वाईटावर चांगल्याचा विजय मिळविण्याकरिता सकारात्मकतेच्या रंगांची उधळण होणे आवश्यक आहे. हे जरी खरे असले तरी सद्धस्थितीत उपलब्ध असणार्या कृत्रिम रंगामध्ये कॉपर सल्फेट, मर्क्युरी सल्फाईड इत्यादी घातक रसायने असल्याकारणाने ह्या रंगासोबत होळी खेळणे कितपत योग्य आहे असा प्रश्न वृक्षमित्र गजानन मुलंगे ह्यांनी स्वतःच्या घरी आयोजित केलेल्या पर्यावरणपूरक होलिकोत्सव कार्यक्रमादरम्यान व्यक्त केले. कार्यक्रमाकरिता दिगांबर




खरबळ शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती रिसोड, अरूण पडवे नायब तहसिलदार वाशिम, मेघश्याम पत्रे केंद्रप्रमुख निजामपूर, श्यामल डांगे सदस्या नगर परिषद रिसोड इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते. उकळत्या पाण्यामध्ये पळसाच्या केसरी फुलांच्या पाकळ्या टाकून केसरी रंग तयार करण्याचे प्रात्याक्षिक करून दाखविण्यात आले तसेचं खरबळ ह्यांनी बीट या कंदमुळापासून गर्द लाल रंग, पालकापासून गर्द हिरवा रंगतयार करण्याच्या सोप्या पध्दतीचे वर्णन केले. आज प्रत्येक व्यक्तीकडे माकूल पैसा आहे पण आत्मसमाधान व घरामध्ये शांतता किती परिवाराकडे आहे हा कळीचा मुद्दा आहे. वस्तू खरेदी करून दिल्यापेक्षा पालकांनी आर्वजून वेळ काढून जर त्यांना प्रसंगानुरूप छोट्या-मोठ्या वस्तू तयार करण्यास प्रोत्साहित केले तर त्यांच्या हातामध्ये जवळपास २४ तास चिकटून राहणारा मोबाईल हिसकावून घेण्याची वेळ येणार नाही. पाल्यांच्या प्रत्येक विचारांना पैशात मोजण्यापेक्षा त्यांना कृतिशील ठेवणे काळाची गरज आहे. सरते शेवटी 'लहान करा होळी, दान करा पुरणपोळी' चा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. श. प्र.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) | R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम पत्रकारांनी करावे - केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

## वाशीम येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशनाचे थाटात उद्घाटन

**वाशिम - धार्मिकता व आध्यात्मिकता यांचे खरे ज्ञान जरुरी आहे. समाजामध्ये आज मोठी विसंगती दिसत असून व्यसन विभिचार व अनैतिकताला अनेक जण प्राथमिकता देत असल्याचे चित्र डोळ्यासमोर येत आहे ही बाब निश्चित चिंतनिया आहे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून समाज प्रबोधन करून सुसंस्कारित पिढी निर्माण करण्याचे कार्य केले आहे मानवता हे धर्म मेरा हा संदेश महाराजांनी दिला.**




वाशिम : समाजात घडणाऱ्या घटना व मुद्द्यांवर सत्य आणि निसपक्ष दृष्टिकोन ठेवून पत्रकारांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे .पत्रकार हा समाज आणि शासन यांच्यामधील संवाद साधणारा महत्त्वपूर्ण दुवा आहे. पत्रकारांनी शासनाच्या प्रत्येक कामकाजावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे .समाजाला जागृत करणे चांगल्या गोष्टीला प्रोत्साहन देणे ही भूमिका त्यांनी कायम ठेवावी. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम पत्रकारांनी करावे असे आव्हान केंद्रीय आयुष मंत्री नामदार प्रतापराव जाधव यांनी केले.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमानाने शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी वैकंठधामवासी मातोश्री सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी परिसर वाटाणे लॉन वाशिम येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, पुरस्कार व पदाधिकारी सन्मान पार पडला. सदर सोहळ्याच्या उद्घाटक म्हणून त्यांनी वरील प्रतिपादन केले.

स्थानिक वाटाणे लॉन येथे आयोजित राज्यस्तरीय पत्रकार संम्मेलनाचे उद्घाटन केंद्रीय आयुष मंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते थाटात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह भ प. दिनकरराव वाटाणे होते. विशेष आशिर्वाद उपस्थिती म्हणून आयोध्या मंदिर कोषाध्यक्ष गोविंद गिरी महाराज यांचे बंधू भागवताचार्य प.पु. रमाकांत व्यास, श्री महाकाली संस्थान कासोळा देव येथील प.पु. गजानंद माऊली, तर विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे,, नगराध्यक्ष अनिल केंदळे, उपाध्यक्ष राजु भांदुर्गे, , वाशिम अर्बन बँक अध्यक्षा श्रीमती शिला राठी, डॉ. हेमराज लाहोटी, , माजी नगराध्यक्ष अशोक हेडा, , मुख्य समन्वयक डॉ. हरीश बाहेती , स्वागताध्यक्ष गिरधारीलाल सारडा, आयोजन समिती कार्याध्यक्ष शिवाजीराव वाटाणे, सह स्वागत अध्यक्ष देवेंद्र खडसे पाटील,ज्येष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे,व्यापारी मंडळ जिल्हाध्यक्ष जुगलकिशोर कोठारी, , प्रदेश प्रसिध्दीप्रमुख नवनाथ जाधव, रिपाइं आठवले गट जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे, प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, , प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, किशोर रायसाकडा, कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर, पश्चिम विदर्भ प्रमुख अनुप कुमार भार्गव, सुरेश खोसे, रवींद्र गुरव,विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, अमरावती विभागीय अध्यक्ष सुनिल फुलारी, चर्मकार समाज जिल्हाध्यक्ष दिपक ढोके समवेत मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर व मातोश्री वैकुंठधामवासी सो.स्नेहलता सोमानी यांच्या प्रतिमेचे पूजन हार अर्पण व दीप प्रजलवन करण्यात आले.

सदर कार्यक्रमात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना महाराष्ट्र भूषण, भागवताचार्य डॉ. रमाकांत व्यास यांना संत सेवाश्री पुरस्कार, दिनकरराव वाटाणे यांना वारकरी सेवा पुरस्कार, राधेश्याम चांडक विदर्भ भूषण, सुलतानपूर येथील सुप्रसिद्ध डॉक्टर हेमराज लाहोटी यांना विदर्भभूषण,डॉ. हरिष बाहेती व डॉ. सरोज बाहेती विदर्भ भूषण, ह.भ.प. पंकजपाल महाराज विदर्भ गौरव, श्रीमती शिलाताई राठी जीवन गौरव पुरस्कार, माधवराव पुरस्कार जीवन गौरव पुरस्कार, देविदास पाटील राऊत गौसेवक पुरस्कार, जेष्ठ साहित्यीक स्व. भाष्करराव मुंढे यांना मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार, समाजसेवक मिलींद भावसार उद्योजक पुरस्कार, गोपाल गिरधारीलाल सारडा उद्योजक पुरस्कार, स्वप्नील देवेंद्र खडसे पाटील उद्योजक पुरस्कार, अमोल पाटणकर वाशिम जिल्हा भूषण, वास्तुविशारद हर्षद शर्मा वाशिम रत्न पुरस्कार, शेखर बंग समाजसेवक पुरस्कार, मोहित कर्नावट युथ आयकॉन पुरस्कार, अविनाश मारशेटवार सेवारत्न पुरस्कार, शाम सवाई आदर्श समाजसेवक पुरस्कार, प्रविण पट्टेबहादुर यांना सेवारत्न , मनीष डांगे यांना दिव्यांग सेवक, समाजसेविका सौ संगीता वसंत इंगोले,योग प्रशिक्षक सौ.दीपा रवि वानखेडे, वास्तु विशारद सौ.अर्चना मेहकरकर, योग प्रशिक्षक सौ . तारा राजू कलवार यांना नारीरत्न पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले. आकर्षक सन्मान चिन्ह , सुवर्णपदक व वामनराव पै यांची विश्व कल्याण पार्थना सर्वांना प्रदान करण्यात आली. तर आदर्श संस्था म्हणून केशव गौरक्षण मंगरुळपीर ,छाया फाऊंडेशन वाशिम, वारकरी सेवा संस्था वांगी, पिरॉमिड स्पिरिचुअल सोसायटी मुवमेंट वाशिम, तिरुपती सेवा गृप परिवार, वाशिम यांना सन्मानीत आले. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने किशोर रायसाकडा, नयन मोंढे, राकेश खराडे, शंकर बोरघरे, अनुप भार्गव, गणेश देगावकर, नागेश आदापुरे, दशरथ चव्हाण, पोपटराव गव्हांदे, वैभव स्वामी, राजेंद्र शिंदे, राज्यस्तरीय उत्कृष्ट संघटक म्हणून नवचेतना पुरस्कार तर पत्रकार भारती सोमाणी व वृषाली टेकाळे यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमांमध्ये राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष व वरिष्ठ पदाधिकारी यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी भागवताचार्य प.पू.रमाकांत व्यास यांनी जीवनात परिवार व समाजातील लोकांची आपले वागणे कशा प्रकारचे ही गोष्ट महत्वपूर्ण आहे, मंदिरात जाणाऱ्या व्यक्ती घरातील आई-वडील व ज्येष्ठांचा अपमान करत असेल तर त्याचे मंदिरात जाणे व्यर्थ आहे असे सांगून पत्रकारांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून दुर्लक्षित घटकांना न्याय मिळवून देण्याची भूमिका वटवावी असे आव्हान केले. परमपूज्य गजानंद माऊली यांनी माणूस धनाने नव्हे तर मनाने मोठा पाहिजे. समाजामध्ये आपल्या लेखणीच्या माध्यमातून वाईट कृत्य घडणार नाही कुणाचेही मने दुखावले जाणार नाही याची दक्षता घेणे जरुरी आहे निंदकाला सुद्धा आपण धन्यवाद दिले पाहिजे कारण त्याच्यामुळे आपल्याला चांगले कार्य करण्याचे बळ मिळते. लोकशाहीच्या नैतिक मूल्याचे रक्षण करणे हे पत्रकारांचे कर्तव्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तधनंतर द्वितीय सत्रात पत्रकारांचा डिएनए काय व अजितदादा पवार यांच्या मृत्यूचे राजकारण तर होत नाही ना?

व सायबर युगातील माध्यमे आणि मुल्यनिष्ठ पत्रकारीता या विषयावर ज्येष्ठ संपादक डॉ राजेश राजोरे यांनी सत्य, संयम व समाजहित हाच पत्रकाराचा खरा डीएनए आहे, असे सांगून माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा यांच्या निधनानंतर ज्या प्रकारचे वृत्तांत मीडियाने केले त्यावर चिंतन करण्याची वेळ आली आहे.

एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर अशा प्रकारच्या चुकीच्या संकल्पना समाज माध्यमातून पोहोचवणे घातक असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकारांनी नेहमी सत्याची बाबी उचलून धरावी असेही त्यांनी सांगितले. पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कार्याची माहिती सर्वांसमोर ठेवली. पत्रकारांसाठी शासनाने लाडकी बहीण योजनेप्रमाणे लाडका पत्रकार योजना सुरू करण्याची मागणी केली,

अधिवेशनामध्ये त्यांनी विविध ठराव मांडले त्याला सर्वांनी एकमताने मान्यता प्रदान केली. सदर कार्यक्रमामध्ये सहकार्य करणार्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. श्री संत सावता माळी व्यायाम प्रसारक मंडळ, रनचंडिका बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित श्री संत सावता माळी क्रीडा मंडळ यांच्या विद्यार्थ्यांनी शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिक सादरीकरण केले, श्री संत ज्ञानेश्वर माऊली वारकरी संस्थेच्या वतीने वारकरी दिंडी द्वारा मान्यवरांचे स्वागत करण्यात आले, श्री विश्वमांगल्य महासभा वतीने लेझीम पथकाच्या द्वारे मान्यवरांचे स्वागत केले,

सदर प्रात्यक्षिक व सादरीकरणाने सर्वांच्या डोळ्यांचे पारणे फिटले याकरिता गुरुवर्य अंबादास इंगोले , राजू राऊत, दामोदर इंगोले, केशव इंगोले ,प्रवीण राऊत, संगराताई चुंबळकर यांचे सहकार्य लाभले.

संत व मान्यवर यांचे आगमन पवन शर्मा यांच्या वतीने वेडिंग इव्हेंट मॅनेजमेंट द्वारे रॉयल विंटेज कारच्या माध्यमातून धमाकेदार पद्धतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश सोमानी, संचालन नेहा काळे व राशी राजपुरोहित तर आभार सुरेश टेकाळे यांनी मानले. सदर संमेलनाला संपूर्ण राज्यभरातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रा. डॉ. गायकवाड यांना राष्ट्रीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार



रिसोड : स्व पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथालयशास्त्र विभागप्रमुख व आदर्श सेवा निवृत मुख्याध्यापक रामराव शंकरराव गायकवाड यांचे सुपुत्र प्रा डॉ विजय शशिकला रामराव गायकवाड यांना भारत सरकार व्यवहार मंत्रालय अधिकृत माणुसकी सोशल व ग्राहक संरक्षण फाउंडेशन यांच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय पातळीवरिल प्रतिष्ठित राष्ट्रीय आदर्श प्राध्यापक सन्मान पुरस्कार नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सहाय्यक आयुक्त मनीष सानप, न्यायाधीश शिल्पा डोलारकर, शिक्षणाधिकारी डॉ नेहा शिरोळे, तहसीलदार प्रज्ञा हिरे, ग्राहक संरक्षण समिती चे अध्यक्ष श्री दादाभाऊ केदारे व राष्ट्रीय सचिव डॉ अविनाश झोटींग यांच्या हस्ते देण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रीय ग्राहक संरक्षण समितीचे अध्यक्ष श्री दादाभाऊ केदारे म्हणाले की प्रा डॉ विजय गायकवाड हे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात निस्वार्थ भावनेने करत असलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय व प्रेरणादायी आहे. त्यांच्या समर्पित सेवेमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असून अनेकाना दिशा व प्रेरणा लाभत आहे. त्यांच्या या मोलाच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. तर राष्ट्रीय सचिव डॉ अविनाश झोटींग यांनी प्रा डॉ विजय गायकवाड यांचे विद्यार्थ्यांप्रती योगदान कौतुकास्पद तसेच आदर्शवत आहे त्यामुळेच त्यांची या पुरस्कारासाठी निवड झालेली आहे. याआधी प्रा डॉ विजय गायकवाड यांना ०१) महाविद्यालयीन विद्यार्थी जीवनात आदर्श विद्यार्थी, ०२) कोव्हिड १९ काळात विद्यापीठ महाविद्यालयीन परीक्षेचे उत्कृष्ट पद्धतीने संचलन केल्याबद्दल केंद्राधिकारी, ०३)विद्यार्थी हिताय कार्याबद्दल सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मराठवाड्यातील प्रतिष्ठित मराठवाडा रत्न, ०४) सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल शिवछत्रपती प्रेरणा पुरस्कार इत्यादी वरील पुरस्कार आतापर्यंत मिळालेले आहेत. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल जीवन विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबारावजी खडसे पाटील, सचिव अमित पाटील, अक्षय पाटील, उ शि का अ मा प्राचार्य डॉ जे बी देव्हडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम एन गायकवाड, प्रा डॉ आदिनाथ बदर तसेच प्राध्यापक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले असुन हिंगोली वाशिम जिल्यातील पंचक्रोशीत त्यांच्या या पुरस्कार मिळाल्याबद्दल कौतुक होत आहे.(वि. प्र)

## अंगणवाडी ते पोषण योजनांपर्यंत सर्व माहिती एका पुस्तिकेत

मुंबई, दि. २५ : राज्यातील महिला व बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत सुलभपणे पोहोचावी या उद्देशाने महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते मंत्रालयात एकात्मिक बाल विकास सेवा (आसीडीएस) योजनेच्या माहिती पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले.

यावेळी महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आसीडीएस आयुक्त कैलास पगारे, उपायुक्त विजय क्षीरसागर यांसह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, राज्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. या समावेशक पुस्तिकेमुळे अंगणवाडी सेवा, पोषण योजना, बालसंवर्धन उपक्रम तसेच नावीन्यपूर्ण कार्यक्रमांची सविस्तर माहिती एका ठिकाणी उपलब्ध होईल. यामुळे योजनांचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होईल. या माहिती पुस्तिकेत कार्यरत व नव्या योजनांची ध्येय-उद्दिष्टे, लाभार्थी पात्रता, आकडेवारीनिहाय माहिती आणि अंमलबजावणीची प्रक्रिया यांचा समावेश करण्यात आला आहे.

## पाटील महाविद्यालयात कु. श्रेया देशमुख या विद्यार्थिनीचा सत्कार



रिसोडः येथील स्व.पुष्पादेवी पाटील कला महाविद्यालयाची राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेविका असलेली जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमधील विजेती द्वितीय क्रमांक प्राप्त कु. श्रेया अनंतराव देशमुख या विद्यार्थिनीचा मा.अक्षय पाटील व प्राचार्य डॉ.एम.एन.गायकवाड यांनी जीवन विकास शिक्षण संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार केला. युवा व क्रीडा मंत्रालय भारत सरकार, राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारा पुरस्कृत व मातोश्री शांताबाई गोटे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम द्वारा दि. २७ फेब्रुवारी रोजी आयोजित विकसित भारत युवा संसद २०२६ कार्यक्रमांतर्गत 'आणीबाणीची पन्नास वर्षे: लोकशाहीसाठी धडे' या विषयावरील जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त करून कु. श्रेया देशमुख हिने घवघवीत यश प्राप्त केले. त्याचबरोबर विशाल आटोळे, प्रणव जाधव,आदित्य खोडके,वैष्णवी खोलगडे कांचन वानखेडे,पायल मोरे, ऋतुजा कव्हर यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला याबद्दल मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन सर्वांचे स्वागत व सत्कार केला. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. केशव कोकाटे यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे नेतृत्व केले. माय भारत पोर्टल वरून ऑनलाईन नोंदणी झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक-सेविकांसाठी आयोजित असलेल्या स्पर्धेत

आपल्या महाविद्यालयातील कु. श्रेया अनंतराव देशमुख या स्वयंसेविकेने द्वितीय क्रमांक पटकावत महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवल्याने आनंद आल्याची भावना अक्षय पाटील यांनी व्यक्त केली. प्राचार्य डॉ.एम.एन गायकवाड यांनी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून निवडल्या गेलेल्या विजेत्यांची मुंबई येथे राज्यस्तरावर स्पर्धा होऊन त्यानंतर दिल्ली येथे अंतिम स्पर्धा होणार आहे. त्यामध्ये कु.श्रेयाला निश्चितपणे यश मिळणार अशी अपेक्षा व्यक्त केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या डॉ. छाया खिल्लारे, डॉ. रवी खाडे यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांचे या यशाबद्दल सर्वत्र कौतुक केले जात आहे. (वि. प्र)

## आचार्य पदवीने प्रा. पुरुषोत्तम चाटे सन्मानित

रिसोड, दि. २ (प्रतिनिधी)

तालुक्यातील जवळा येथील मुळ रहिवासी असलेले प्राध्यापक पुरुषोत्तम रंगराव चाटे यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाद्वारे अर्थशास्त्र विषयात आचार्य (पीएच.डी) पदवीने सन्मानित करण्यात आले असून सध्या ते श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा, जि. बुलढाणा येथे अर्थशास्त्र विभागात कार्यरत आहेत.

पश्चिम विदर्भातील बदलत्या पीकरचनेचा अभ्यास (कालावधी २०१०-११ ते २०१९-२०) या कृषी क्षेत्राशी निगडीत अत्यंत



महत्त्वपूर्ण विषयावर त्यांनी आपला संशोधन प्रबंध संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठास सादर केला होता. प्रस्तुत संशोधन प्रबंधात त्यांनी शेती,शेतीम धील बदलती पीकरचना, पीक पद्धती, सिंचित व कोरडवाहू शेती मधील समस्या, सिंचन पद्धती, कृषी पुरक व्यवसाय, शासनाच्या कृषीविषयक विविध योजना, शेती करण्याची पद्धती, शेतमाल हमी भाव योजना, शेतीमधील समस्या आणि संधी इत्यादी विषयावर संशोधन केलेले आहे. जवळा या हजार- बाराशे लोकसंख्या असलेल्या अतिशय लहानशा गावातून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केलेले असून सध्या ते श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा,जि. बुलढाणा येथे अर्थशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर तसेच कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य डॉ.गजानन जाधव, सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले.प्रा.पुरुषोत्तम चाटे यांनी आपल्या यशाचे श्रेय श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व सर्व कार्यकारिणी मार्गदर्शक प्रा.डॉ. संतोष कुटे, मेहेकर, प्राचार्य डॉ.गजानन जाधव मोताळा, वडील रंगराव चाटे,भाऊ निरंजन चाटे, पत्नी रुपाली चाटे,मुली स्वरा व गार्गी यांना दिले आहे.

## बांबू बीजधारणा एक दुर्मिळ नैसर्गिक घटना : गजानन मुलंगे

◆ रिसोड, २ मार्च

बांबूची उंची, त्यांचे रंग- रूप, पोकळ व भरीवपणा इत्यादी गुणधर्मानुसार भारतामध्ये एकूण १४० बांबूच्या प्रजाती आढळतात. बांबू रोप निर्मिती ही सहसा परिपक्व बांबूच्या पेरकांड्याच्या जोडावर आलेल्या डोळ्या पासून करतात. पण बांबू लागवडीपासून साधारणतः ५० वर्षानंतर बांबूच्या प्रत्येक पेरकांडाना फुले लागून तपकिरी रंग व तांदुळाच्या आकाराची बीज निर्मिती होते ही एक दुर्मिळ नैसर्गिक घटना आहे, असे प्रतिपादन वृक्षमित्र गजानन मुलंगे यांनी रिसोड येथील नामदेव गाडे यांच्या शेतामध्ये बीजधारी बांबूच्या बेटाचे निरीक्षण करताना केले.

या अद्भूत नैसर्गिक घटनेचे निरीक्षक चमू मध्ये सामाजिक वनीकरण विभागाचे लागवड अधिकारी अरविंद ईढोळे, वनरक्षक प्रमोद जावळे, वनमजूर संदीप डांगे,




बीजधारी बांबूची पाहणी करताना वनविभागाचे अधिकारी

गजानन कोरडे प्रामुख्याने उपस्थित होते. कोणत्याही प्रकारच्या व विविध ठिकाणी केलेल्या बांबू लागवडीनंतर साधारणतः ५० ते १२० वर्षादरम्यान फूलरूपी बीजधारणा होऊ शकते आणि ही दुर्मिळ नैसर्गिक घटना घडत असताना बांबूचे बेट त्याच्या जीवनक्रमाच्या अंतिम टप्प्यामध्ये असते अर्थात बीजधारणेनंतर बांबूचे बेट पूर्णपणे वाळते असे त्यांनी सांगितले.

बांबूच्या बियांना आदिवासी बहुल क्षेत्रामध्ये बांस का चॉवल सुध्दा म्हणतात. सदरहू बीजामध्ये भरपूर प्रमाणात फायबर, प्रोटीन, कार्बोहायड्रेट इतकेच नव्हे तर जीवनसत्वे आढळून येतात. त्याचप्रमाणे ह्या बीजाच्या सेवनाने पुरुषामध्ये शुक्रजंतूंची संख्या आणि स्त्रियांची प्रजनन क्षमता सुध्दा भरपूर प्रमाणात वाढते अशी माहिती त्यांनी दिली आहे.

कोलेस्ट्रॉलचे प्रमाण नगण्य असल्याकारणाने ह्या बियांच्या सेवनाने लठ्ठपणावर आळा बसेल. एवढ्या आयुर्वेदिक औषधी चा खजिना असणारे कदाचित हे एकमेव बियाणे असेल. बियांच्या उत्पादन क्षमतेमध्ये ५० वर्षाचा फार मोठा कालावधी असल्याकारणाने बाजारामध्ये ह्या बियांची उपलब्धता फारच कमी आहे तरी पण आभासी अर्थात ऑनलाईन पध्दतीने बीज उपलब्ध होऊ शकते असेही मुलंगे म्हणाले.

## सेवानिवृत्त मुख्याध्यापक जाधव यांचा सत्कार

रिसोडः स्वामी विवेकानंद विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय व्याड चे मुख्याध्यापक शिवाजीराव जाधव प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.

यावेळी निरोप समारंभासाठी अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मार्गदर्शक त्र्यंबक दादा बोंडे व प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष ?ड दिलीपरावजी सरनाईक ,उपाध्यक्ष विलासराव सरनाईक,संचालक,राम सरनाईक, डॉक्टर गायकवाड, मुख्याध्यापक संघटना,शिक्षकेतर संघटना,वलाना, चिखली,पिंपरी व बटवाडी येथील पालक वर्ग व सत्कारमूर्ती शिवाजीराव जाधव उपस्थित होतेअनेक मान्यवरांनी जाधव सर यांच्या तीस वर्षाच्या सेवेतील आठवणींना उजाळा दिला.पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष मंगेशराव सरनाईक यांनी याप्रसंगी आपले विचार व्यक्त केले



विद्यालयाचे अध्यक्ष दिलीपरावजी सरनाईक यांनी जाधव सर बद्दल सांगताना म्हटले की, चांगला मुख्याध्यापक तो असतो ज्यांच्या डोक्यावर बर्फ आणि तोंडात साखर असते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक रवी अंभोरे तर आभार प्रदर्शन सत्कारमूर्ती शिवाजीराव जाधव सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले. (वि. प्र)

## आ. रोहीत पवार यांना झेड प्लस सुरक्षा देण्याची मागणी

रिसोडः बारामती येथे झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाले. हा अपघात की घातपात, याविषयी राज्यभरात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून घटनेची सखोल व निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे.

या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी काही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. संबंधित प्रकरणात काही त्रुटी आढळल्याचे समोर आले असून नागरी उड्डाण महासंचालनालय (ॲग्रीमूर्ती उर्हीत द ण्णर्न्ग़ैगृह) यांनी संबंधित विमान कंपनीच्या काही विमानांवर बंदी घातल्याची माहितीही पुढे आली आहे. जर हा अपघात नसून सुनियोजित



कटाचा भाग असेल, तर अशा प्रकरणात सत्य बाहेर आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या आमदार रोहित पवार यांच्या जीवितास संभाव्य धोका निर्माण होऊ शकतो, अशी भावना व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांना तात्काळ झेड प्लस सुरक्षा देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) तर्फे करण्यात आली आहे.

यासंदर्भात तहसीलदार यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत सादर करण्यात आले. यावेळी कैलास पाटील खानझोडे, तालुका अध्यक्ष गजाननराव सरनाईक, युवक तालुका अध्यक्ष माधवराव शेवाळे, कार्याध्यक्ष मुरलीधर जुनघरे, शहराध्यक्ष साजिद भाई, नितीन पाटील सरकटे, भागवतराव बोडखे, निलेश बोडखे, संदीप पाटील पाचरणे, पुरुषोत्तम नरवाडे, रमेश पाटील सदार, गजानन बोरुडे, सुरज सरनाईक यांच्यासह अमित पाटील खडसे मित्र परिवारातील सदस्य व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (वि. प्र)

## राज्यसभेच्या महाराष्ट्रातील ७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणूक जाहीर; १६ मार्चला मतदान व मतमोजणी

मुंबई, दि. २० : भारत निवडणूक आयोगाने १० राज्यांमधील रिक्त होणाऱ्या राज्यसभेच्या ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील सात जागांचा समावेश आहे. या सात जागांसाठी १६ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान आणि त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता मतमोजणी होणार आहे. महाराष्ट्रातील डॉ. भागवत किशनराव कराड, डॉ. फौजिया तहसीन अहमद खान, प्रियंका विक्रम चतुर्वेदी, शरदचंद्र गोविंदराव पवार, धैर्यशील मोहन पाटील, रजनी अशोकराव पाटील आणि रामदास बंडू आठवले या सदस्यांची मुदत २ एप्रिल २०२६ रोजी संपणार असल्याने भारत निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या या सात जागांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे.